# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB · Legrand · HAVELLS · Finolex · KOLORS · USHA · PHILIPS · GreatWhite · SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक ११४ वा बुधवार दि.२० सप्टेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## वृत्तवाहिन्यांनी स्व-नियामक यंत्रणा कठोर करावी

नवी दिल्ली : वृत्तवाहिन्यांवर लक्ष ठेवणारी स्वयं-नियामक यंत्रणा आम्हाला कडक करायची आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने सोमवार दि. १८ सप्टेंबर रोजी सांगितले. न्यायालयाने न्यूज ब्रॉडकास्टर्स अँड डिजिटल असोसिएशनला नवीन मार्गदर्शक तत्त्वे आणण्यासाठी आणखी ४ आठवड्यांची मुदत दिली आहे.

वास्तविक, एनबीडीएने सांगितले की नवीन मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी आम्ही आमचे विद्यमान अध्यक्ष न्यायमूर्ती (निवृत्त) एके सिकरी आणि माजी अध्यक्ष आरव्ही रवींद्रन यांच्याशी चर्चा करत आ-होत. त्यावर उत्तर देताना सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी परडीवाल आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने या गोष्टी सांगितल्या. सुनावणीदरम्यान एनबीडीएच्या वतीने ज्येष्ठ वकील अरिंवद दातार न्यायालयात हजर झाले.

नवीन मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी त्यांनी चार आठवड्यांचा वेळ मागितला. केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता हजर झाले. ते म्हणाले की, केंद्र सरकारने आधीच त्रिस्तरीय प्रणाली तयार केली आहे, ज्यामध्ये पहिले पाऊल म्हणजे स्वयं-नियमन आहे. न्यूज ब्रॉडकास्टर्स फेडरेशन ऑफ इंडियासाठी उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील महेश जेठमलानी म्हणाले की, एनबीडीएच्या विपरीत, २०२२ च्या नियमांनुसार, एनबीएफआयही केंद्राकडे नोंदणीकृत एकमेव नियामक युनिट आहे. एनबीएफआयला देखील त्यांचे स्वत:चे नियम फाइल करण्याची परवानगी द्यावी.

सीजेआय म्हणाले की आम्हाला स्वयं-नियमन यंत्रणा कडक करायची आहे.

## जिल्ह्यात आजपासून ‘आधारवड पंधरवडा’चे आयोजन

लातूर, दि. १८ (जिमाका) : जागतिक जेष्ठ नागरिक दिनानिमित्त जिल्ह्यात १९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२३ या काळात ‘आध-ारवड पंधरवडा’ आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी शासकीय यंत्रणांमार्फत विविध कार्यक्रम, शिबिरे, मेळावे आयोजित करून त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या आहेत.लातूर जिल्हा परिषद, महानगरपालिका, जिल्हा पोलीस अधिक्षक. सर्व उपविभागीय अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा समाज कल्याण अधिकारी व समाज कल्याण सहायक आयुक्त यांच्यामार्फत ‘आधारवड पंधरवाडा’ अंतर्गत ज्येष्ठ नागरिक मेळावे घेण्यात येणार आहेत. या पंधरवाडामध्ये लातूर शहर महानगरपालिकेने लातूर शहरी भागातील जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांची िीरिश्र.ररवहरीुरव.लो या संकेतस्थळावर नोंदणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सर्व तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी पंधरवाडा काळात ज्येष्ठ नागरिकांसाठी पेन्शन अदालत घ्यावी, तसेच त्यांना विशेष सहाय्य योजनांचा लाभ द्यावा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी महानगरपालिका हद्दीत व ग्रामीण भागात आरोग्य शिबीराचे आयोजन करावे, मधुमेह रुग्णांना गोळ्या वाटप करणे, मोतीबिंदु असलेल्या रुग्णांची नेत्रतपासणी करण्याच्याही सूचना देण्यात आल्या आहेत.जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाने ज्येष्ठ नागरिकांचे समुपदेशन शिबीर आयोजित करावे. जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाने ग्रामपंचायत पातळीवर ज्येष्ठांसाठी विशेष ग्रामसभा घ्याव्यात. तसेच त्यांच्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे, याबाबत सूचना देण्यात आल्याचे समाज कल्याण सहायक आयुक्त एस. एन. चिकुर्ते यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## 'केशवराज' विद्यालयात श्रीगणेशाची उत्साहात प्रतिष्ठापना

लातूर /प्रतिनिधी:येथील श्री केशवराज माजी विद्यार्थी संघ व श्री केशवराज माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळव-ारी (दि. १९) श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत श्री-गणेशाची उत्साहात प्रतिष्ठापना करण्यात आली.



लेझीम पथकाच्या मिरवणुकीतून 'गणप-ती बाप्पा मोरया'च्या जयघोषात श्रीगणेशाचे आगमन विद्यालयात झाले.संस्था केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव,स्थानिक समन्वय समिती कार्यवाह शैलेश कुलकर्णी,शालेय समिती अध्यक्ष गंगाधर खेडकर,माजी मुख्याध्यापक उमेश सेलुकर,केशवराज माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष प्रदीप राऊत, मुख्याध्यापक प्रदीप कुलकर्णी, उपमुख्याध्यापक तथा विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे,पर्यवेक्षक संदीप देशमुख,दिलीप चव्हाण, बबन गायकवाड, पर्यवेक्षिका श्रीमती अंजली निर्मळे यांच्या उपस्थितीत गणेशाची पूजा व आरती करण्यात आली.

यावेळी लेझीम पथकातील आकर्षक वेशभूषेमध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींनी लेझीम नृत्य सादर करून सर्वांचे लक्ष वेधले.याप्रसंगी सर्व मान्यवरांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी गणेशोत्सव प्रमुख तथा अभ्यासपूरक मंडळ प्रमुख श्रीमती शैला सांगवीकर,सहप्रमुख धनंजय कुलकर्णी,संस्कार मंडळ प्रमुख श्रीमती जान्हवी देशमुख,श्रीमती संगीता लोखंडे,क्रीडा शिक्षक गुरूनाथ झुंजारे,प्रयागराज गरूड यांनी परिश्रम घेतले.

## दिलीपराव देशमुख, धिरज देशमुख यांच्याकडून स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन

लातूर : मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या अमृत महोत्सवानिमित्ताने मुक्तीसंग्रामात बलिदान दिलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या आशिव (ता. औसा) येथील स्मारकाला आज भेट देवून सहकारमहर्षी, माजी मंत्री श्री. दिलीपराव देशमुख, 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी विनम्र अभिवादन केले. या लढ्यात स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला संघर्ष व त्याग पिढ्यानपिढ्या प्रेरणा देणारा आहे, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.




याप्रसंगी श्रीशैल उटगे, श्रीपतराव काकडे, आबासाहेब पाटील, गणपत बाजुळगे, रविंद्र काळे, उदयसिंह देशमुख, संभाजी सूळ, प्रमोद जाधव, पृथ्वीराज शिरसाठ, बाबासाहेब गायकवाड, राजकुमार पाटील, सचिन पाटील, अनुप शेळके, सपना किसवे, स्वयंप्रभा पाटील, आशिवचे सरपंच रमेश वळके, उपसरपंच पप्पू दुधभाते, खंडेराव पाटील, पंढरीनाथ जगताप, राजेंद्र माने, माणिक जगताप यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## गणेशोत्सव शांततेत पाडण्यासाठी सर्व गणेश मंडळांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे

लातूर, दि. १९ (जिमाका) : जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळानी पोलिसांनी आखून दिलेल्या नियमाच्या चौकटीत राहून गणेशोत्सव साजरा करावा. गणेशोत्सव साजरा करताना कोणती काळजी घ्यावी, यासाठी पो-लीस प्रशासनाने 'आचारसंहिता' ही पुस्तिका काढली आहे. गणेश मंडळ कार्यकर्त्यांनी या पुस्तिकेतील सर्व नियमांचे पालन करून गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी केले आहे.




जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आलेल्या गणेशोत्सव तयारीचा आढावा घेण्यासाठी शासकीय विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत ना. बनसोडे बोलत होते. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घु-गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्यासह अधिकारी यावेळी उपस्थित होते.

उदगीर येथे गणेश मंडळाबरोबर गणेशोत्सव या संदर्भात आपण जिल्हा पोलीस अधिक्षक सोमय मुंढे यांच्यासह बैठक घेतली. जिल्ह्यात सगळीकडे पोलीस प्रशासनाकडून अशा बैठका झाल्या आहेत. ला-तूर जिल्हा हा नेहमीच आदर्श परंपरा आणि सौहार्द सांभाळणारा म्हणून ओळ-खला जातो. ही परंपरा कायम राखण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. त्यासाठीच जिल्हा प्रशासनाने 'आचारसंहिता ' ही पुस्तिका काढली आहे. सर्व गणेश मंडळानी यातील नियमाचे काटेकोरपणे पालन करावे आणि गणेशोत्सव शांतते पार पडेल, यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस यांना सहकार्य करण्याचे आवाहन मंत्री श्री. बनसोडे यांनी केले आहे.

## नीळकंठेश्वराचा आशीर्वाद घेऊन जलसाक्षरता अभियानास प्रारंभ

## गावोगावी अभियानास उस्फूर्त प्रतिसाद ; हजारो जलयोध्यांचा रॅलीत सहभाग

निलंगा/प्रतिनिधी: ग्रामदैवत नीळकंठेश्वराचे दर्शन व आशीर्वाद घेत आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या जलसाक्षरता अभियानास गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर निलंगा येथून प्रारंभ झाला. पहिल्याच दिवशी गावोगावच्या नागरिकांनी या अभियानास उस्फुर्त प्रतिसाद दिला.हजारो जलयोद्ध्यांसह त्या-त्या गावातील गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, विविध संस्था,संघटनांचे पदाधिकारी,कार्यकर्ते आणि नागरिकांनी या रॅलीत सहभाग नोंदवला. यावर्षी जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती असून शासनाने समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्याला देण्याचा निर्णय घेतला आहे.हे पाणी मांजरा व तेरणा खोऱ्यात सोडावे या प्रमुख मागणीसह जिल्ह्यातील नागरिकांना जलस-ाक्षर करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. संपूर्ण गणेशोत्सवात राबविण्यात येणाऱ्या या अभियानास मंगळव-ारी (दि.१९ )निलंगा येथून प्रारंभ झाला.सकाळी वृंदावन मंगल कार्यालयात सर्वांचे एकत्रीकरण झाल्यानंतर ग्रामदैवत नीळकंठेश्वराचे दर्शन घेऊन अभियानास सुरुवात करण्यात आली. यावेळी नीळकंठेश्वराची महाआरती करण्यात आली.यानंतर माकणी थोर येथे नवसाला पावणाऱ्या हनुमानाचे दर्शन व महाआरती करण्यात आली.जिल्ह्यात समाधानकारक पाऊस पडावा,नागरिकांना पिण्यासाठी व पिकांसाठी पाणी उपलब्ध व्हावे,असे साकडे आ.निलंगेकर यांनी हनुमंताला घातले. उपस्थितांशी संवाद साधताना आ.निलंगेकर म्हणाले की,पाणी हे जीवन आहे.पाण्याशिवाय जगणे





शक्य नाही.यावर्षी आपल्या लातूर जिल्ह्यात अद्यापही पाऊस झालेला नाही त्यामुळे दुष्काळी स्थिती निर्माण झाली आहे. उर्वरित काळात पाऊस झाला नाही तर भीषण परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे.दुष्काळातील उपाययोजना करण्यासाठी आपण शासनाकडे मागणी केलेली आहे.तरीद-ेखील उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करावा, पावसाच्या माध्यमातून मिळणारे पाणी साठवून ठेवावे या संदर्भात जनजागृती करण्यासाठी आपण हे अभियान राबवत आहोत.शासनाने समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्याला देण्याचा निर्णय घेतला आहे. लातूरसह उस्मानाबाद व बीड जिल्ह्याची परिस्थिती पाहता शासनाने हे पाणी मांजरा व तेरणा खोऱ्यात सोडावे,अशी आपली मागणी असल्याचे ते म्हणाले.

प्रारंभी संजय दोरवे व दगडू साळुंके यांनी प्रास्ताविक करून हे अभियान राबविण्यामागची भूमिका विषद केली.शेषराव ममाळे यांनी सूत्रसंचलन केले.पहिल्या दिवशी हलगरा,अंबुलगा,केळगांव, निटुरमोड,निटूर, पानचिंचोली,कोतल शिवणी,हाडगा या गावात ही रॅली पोह-ेचली.त्या गावातील उपस्थितांशी आ.निलंगेकर यांनी संवाद साधला.याप्रसंगी हजारोंच्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

इच्छाशक्तीला हवी जनरेट्याची जोड ...

यावेळी बोलताना आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सांगितले की,मराठवाड्याला चार वेळा मुख्यमंत्रीपद मिळाले. त्या काळात दुष्काळी स्थिती कायमची दूर करण्यासाठी उपाय योजना करण्याची मानसिकता त्या-त्या नेत्यांनी दाखवली परंतु काही नेत्यांच्या दबावामुळे ते शक्य झाले नाही. नेत्यांच्या इच्छाशक्तीला जनरेट्याची जोड मिळाली असती तर शासनाला त्याची दखल घ्यावी लागली असती.आता देखील शासनाने निर्णय घेतला आहे.त्याला जनरेट्याचे पाठबळ मिळावे म्हणूनच सरकारमध्ये असूनही आपण हे अभियान राबवित आहोत.शेती आणि उद्योगालाही पाणी मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

उत्स्फूर्त प्रतिसाद....

आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सुरू केलेल्या जलसाक्षरता अभियानास पहिल्याच दिवशी गावोगाव उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी ढोल- ताशांचा गजर व हलगीच्या निनादात दुचाकी रॅलीचे स्वागत करण्यात आले. अनेक ठिकाणी जेसीबीच्या माध्यमातून रॅलीत सहभागी झालेल्या युवकांवर पुष्पवर्षाव करण्यात आला. रॅलीमध्ये रथात स्थापन करण्यात आलेल्या गणपतीची गा-वात आल्यानंतर आरती करण्यात आली.त्यानंतर आ.निलंगेकर उपस्थितांशी संवाद साधत असल्याचे दिसून आले.

हक्काच्या पाण्यासाठी पाठिंबापत्र....

ठिकठिकाणी गणेश मंडळाचे पदाधिकारी,ग्राम पंचायतचे प्रतिनिधी, विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांचे पदाधिकारी, महिला बचत गट,महिला मंडळ व भजनी मंडळाच्या सदस्यांनी हक्काचे पाणी मिळवण्यासाठी आम्ही आपल्यासोबत आहोत असा संकल्प करून आपली पाठिंबापत्रे आ.निलंगेकर यांच्याकडे सुपूर्द केली.

## संपादकीय....

# पोचट पंचांचे प्रजासत्ताक

निवडणूक आयुक्तांस अवनत करणारे विधेयक या अधिवेशनात मंजूर झाल्यास या आयुक्तांवर अन्य ज्येष्ठ बाबूंप्रमाणे खाविंदाचरणी मिलिंदायमान राहण्याची वेळ येईल.

''लोकशाही म्हणजे बहुमताची दडपशाही नाही,'' असे या युगाचा विख्यात लेखक, इतिहासकार युआल नोआ हरारी याने अलीकडे स्वत:च्या देशाचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांस सुनावले. संदर्भ आहे हे पंतप्रधान करू पाहतात त्या न्यायिक सुधारणा! या सुधारणांमुळे बहुमताच्या जोरावर पंतप्रधान नेतान्याहू सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारांस कात्री लावण्याच्या प्रयत्नात असून त्यामुळे न्यायपालिका ही सरकारच्या हातचे निष्क्रिय, निराकार, निर्गुण बाहुले बनण्याचा धोका आहे. या लोकप्रिय आणि तरीही धीट लेखकाचे स्मरण होण्याचे प्रयोजन म्हणजे देशाच्या माजी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांस लिहिलेले पत्र. जे. एम. लिंगडोह, टी. एस. कृष्णमूर्थी, एन. गोपालस्वामी, एस. वाय. कुरेशी, व्ही. एन. संपथ, एच. एस. ब्रह्मा, सैय्यद नसीम झैदी, ओ. पी. रावत अशा अनेक निवृत्त निवडणूक आयुक्तांच्या या संयुक्त पत्रावर स्वाक्षऱ्या आहेत. आधी मुळात आपले निवृत्त का असेना सनदी अधिकारी विद्यमान सरकारच्या विरोधात एखादी भूमिका जाहीरपणे घेतात याचेच खरे तर अप्रूप. लिंगडोह, कुरेशी असे काही अपवाद वगळले तर एरवी कोणत्याही महत्त्वाच्या विषयांवर आपला अधिकारी वर्ग तसे मौन बाळगण्यातच आनंद मानतो. ते मौन सोडून इतके अधिकारी एखाद्या विषयावर एकमताने काही भूमिका घेत असतील आणि तसे सरकारला कळवत असतील तर ही घटना नुसतीच दखलपात्र ठरत नाही. तर ती भाष्ययोग्य ठरते. या प्रकरणात तर अधिकच. कारण प्रश्न आहे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास स्वत:चा कणा ताठ ठेवण्याचे स्वातंत्र्य राहणार का? तो पडतो कारण विद्यमान सरकार मुख्य निवडणूक आयुक्ताचा, सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश पदाचा दर्जा कमी करून त्यास सामान्य बाबूच्या पातळीवर आणून ठेवू पाहाते. सद्य:स्थितीत मुख्य निवडणूक आयुक्त, देशाचे महालेखापाल (म्हणजे 'कॅग') हे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश दर्जास समकक्ष आहेत. म्हणजे ही पदे घटनात्मक आहेत. याचा साधा अर्थ असा की त्यांना अन्य कोणा नोकरशहाप्रमाणे काढून टाकता येत नाही. या पदांवरील व्यक्ती नकोशा झाल्यास महाभियोग चालवावा लागतो आणि ही प्रक्रिया इतकी गुंतागुंतीची असते की तिच्या यशाचे एकही उदाहरण आपल्या प्रशासकीय इतिहासात नाही. याचाच दुसरा अर्थ असा की या पदांवर नेमल्या जाणाऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याची हमी घटनेनेच दिली असून त्यामुळेच निवडणुका राजकीय पक्ष, विशेषत: सत्ताधीशांच्या, दबावाविना पार पाडता येतात. तथापि या पदाचे घटनादत्त स्वातंत्र्य केंद्रास मंजूर नाही, असे दिसते. कारण निवडणूक आयुक्तांस न्यायाधीशपदावरून अवनत करून 'मंत्रिमंडळ सचिव' दर्जावर आणून ठेवणारे विधेयक संसदेच्या या अधिवेशनात प्रस्तावित आहे. ते मंजूर झाल्यास निवडणूक आयुक्तांवर अन्य ज्येष्ठ बाबूंप्रमाणे खाविंदाचरणी मिलिंदायमान राहण्याची वेळ येईल. हे इतकेच नाही.

तर विद्यमान सरकार मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निवडीची प्रक्रियाही बदलू पाहते. सद्य:स्थितीत पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि सरन्यायाधीश यांच्या समितीतर्फे मुख्य निवडणूक आयुक्त निवडले जातात. सरकारला यात सरन्यायाधीशांची उपस्थिती टोचत असल्याचे दिसते. कारण त्यांना वगळून या समितीत त्यांच्याऐवजी एक केंद्रीय मंत्री घेतला जावा, असे सरकारचे म्हणणे. यामागे गेल्या वर्षी सर्वोच्च न्यायालयाने अरुण गोयल यांच्या नियुक्तीवरून केंद्रास फटकारलेले होते, हे कारण असणार हे समजून घेण्यास राजकीय विश्लेषक असण्याची गरज नाही. त्या वेळी या गोयल यांच्या नियुक्तीसाठी केंद्र सरकार इतकी घाई करीत होते की ती पाहून सरकारच्या हेतूविषयी संशय यावा. सर्वोच्च न्यायालयाला तो आलाच. त्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने या मुद्द्यावर केंद्राचे कान उपटल्यामुळे सरकारची शोभा झाली. त्यामुळे आता निवडणूक आयुक्त निवडीच्या समितीत सरन्यायाधीश नकोतच, यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. ते यशस्वी झाले तर ही समिती पूर्णपणे सरकारकेंद्री असेल आणि विरोधी पक्षनेत्याची उपस्थिती ही केवळ दाखवण्यापुरती राहील. कारण पंतप्रधान आणि मंत्री हे एकाच बाजूला आणि दुसरीकडे विरोधी पक्षनेता. सद्य:स्थितीत असे नव्हे; एरवीही कोणता मंत्री पंतप्रधानांविरोधात भूमिका घेईल? या समितीत सरन्यायाधीशांच्या असण्याने निवड प्रक्रियेच्या निष्पक्षतेविषयी काही एक आशा तरी निर्माण होते. ते गेले तर सर्व दोऱ्या सरकारच्या हातीच जातील आणि या पदावरही कमरेत वाटेल तितके वाकण्यास तयार असे अधिकाधिक होयबा तेवढे नियुक्त होतील. सद्य:स्थितीतच निवडणूक आयुक्तांविषयी आदर बाळगावा अशी परिस्थिती नाही. त्यात आहेत ते प्रतिबंधही काढले गेले तर निवडणूक आयुक्त ही यंत्रणा पंतप्रधानांच्या अखत्यारीतील एखादे खाते असावे इतकी रया घालवून बसेल. म्हणजे हे दुहेरी संकट.

एका बाजूने निवडणूक आयुक्त निवड समितीतून सरन्यायाधीशांस वगळायचे आणि त्याच वेळी निवडणूक आयुक्त या पदाचा दर्जा इतका खाली आणायचा की त्याच्या हाती काही स्वतंत्र घटनात्मक अधिकारच राहणार नाहीत. सरकारचा हा प्रयत्न इतका शरमशून्य आणि हास्यास्पद आहे की त्यास त्यातील एक विरोधाभास कळण्याइतकेही भान नाही. म्हणजे असे की सरकार नव्या व्यवस्थेत निवडणूक आयुक्त या पदास मंत्रिमंडळ सचिव या पदाच्या पायरीवर आणून ठेवू इच्छिते. पण हा निवडणूक आयुक्त निवडला जाणार तो याच मंत्रिमंडळ सचिवाकडून निवड समितीसमोर ठेवल्या जाणाऱ्या नावांतून! निवडणूक आयुक्त पदासाठी विचाराधीन असलेल्या व्यक्तींच्या यादीस केंद्रीय मंत्रिमंडळाचा सचिव (कॅबिनेट सेक्रेटरी) अंतिम स्वरूप देतो आणि नंतर सदर समिती यातील व्यक्तींची निवड करते वा नाकारते.

# 'सनातन' अडचण की, नव्या मांडणीचा मार्ग?

संसदेचे विशेष अधिवेशन सोमवारपासून सुरू होईल. त्याचा खरा अजेंडा खरे तर कोणालाही माहिती नाही. लोकसभा सचिवालयाकडून जाहीर झालेल्या कार्यक्रम पत्रिकेनुसार अधिवेशन होणार असेल तर हा सगळा खटाटोप कशासाठी, हा प्रश्न कोणालाही पडेल. केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या निवडप्रक्रियेतून सरन्यायाधीशांना बाजूला करण्यासाठी किंवा पोस्टासंदर्भातील बदल करण्यासाठी संसद सदस्यांना आपापल्या मतदारसंघांतून दिल्लीला बोलावण्याचे ठोस कारण दिसत नाही. विशेष अधिवेशनाच्या कार्यक्रम पत्रिकेतील विधेयके हिवाळी अधिवेशनातही संमत केली जाऊ शकली असती. पण, पंतप्रधान मोदींना धक्कातंत्राचा अधूनमधून वापर करायला आवडते. त्यांच्या या अनपेक्षित गोष्टी करण्याच्या स्वभावामुळे अचानक एखादे विधेयक मांडून विरोधकांमध्ये गोंधळ उडवून देण्याचा प्रयत्न होणारच नाही असे नव्हे. आणि समजा, तसे झाले नाही तर संसदेचा कारभार जुन्या इमारतीतून नव्या इमारतीमध्ये स्थलांतरित होणार आहे, या एकाच उद्देशाने विशेष अधिवेशन घेतले जात असेल. वृत्तांकनासाठी पत्रकारांना वितरित करण्यात आलेल्या प्रवेशिकांवर 'नव्या इमारतीतील प्रवेशासाठी वैध' असे लिहिलेले आहे. संसद अधिवेशनाची जागा बदलण्याचा कार्यक्रमदेखील हिवाळी अधिवेशनात होऊ शकला असता; पण कोणत्या मुहूर्तावर हा घाट घातला गेला हे निर्णय घेणाऱ्यांनाच माहीत! संसदेच्या ७५ वर्षांच्या प्रवासावर दोन्ही सभागृहांमध्ये चर्चा केली जाणार आहे. हा खुला विषय आहे, त्यामध्ये देशातील संसदीय निवडणुकांपासून धर्माधिष्ठित राजकारणापर्यंत कोणत्याही मुद्द्याला स्पर्श करता येऊ शकेल. सध्या गाजत असलेला विषय म्हणजे सनातन धर्म. हा विषयही आडवळणाने वा थेटही या चर्चेमध्ये आणला जाऊ शकतो. विरोधकांपेक्षाही भाजपकडून त्यावर भाष्य केले जाण्याची शक्यता अधिक दिसते. तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचे पुत्र आणि 'द्रमुक'चे नेते उदयनिधी यांनी सनातन धर्मावर टीका करून बरेच दिवस झाले. त्यावर आरोप–प्रत्यारोपही झाले. तरीही हा वाद निवळलेला नाही त्याचे कारण, भाजपचे नेतेच 'सनातन'चा वाद उगाळत आहेत. सनातनच्या वादाला हवा देत राहण्यातून उत्तरेच्या तीन राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये लाभ मिळू शकतो, असा अंदाज भाजपने बांधला असावा. भाजपच्या हाती कोलीत कशासाठी द्यायचे असा विचार करून कदाचित विरोधकांच्या 'इंडिया'ची भोपाळमधील पहिली संयुक्त जाहीर सभाही रद्द झाल्याची घोषणा शनिवारी काँग्रेस नेते कमलनाथ यांनी केली असावी. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या दिल्लीतील निवासस्थानी झालेल्या 'इंडिया'च्या समन्वय समितीच्या बैठकीत संयुक्त सभेवर सहमती झाली होती. मध्य प्रदेश, छत्तीसगढ अगदी राजस्थानमध्येही विधानसभा निवडणुकीत चांगली कामगिरी करता येईल अशी आशा काँग्रेसला वाटत असल्याने 'सनातन'च्या वादापासून 'इंडिया'तील इतर पक्षदेखील बाजूला राहण्याचा प्रयत्न करत असावेत.




तमिळनाडूमध्ये सत्ताधारी 'द्रमुक'ने सनातन धर्माचा वाद उकरून काढण्यामागे भाजपचे आक्रमक हिंदूत्ववादी राजकारण कारणीभूत आहे. त्या राज्यातील द्रमुक असो वा अण्णाद्रमुक असो– या दोन्ही प्रमुख प्रादेशिक पक्षांचे राजकारण ब्राह्मणेतरवादाशी निगडित राहिले आहे. तमिळनाडूमध्ये २.५ ते ३ टक्के ब्राह्मण आहेत, ७० टक्के ओबीसी आहेत. 'द्रमुक'चे पहिले मुख्यमंत्री सी. एन. अण्णादुराई यांनी ब्राह्मणांच्या राजकीय व सांस्कृतिक पुढारपणाला फारसा धक्का लावला नाही. मात्र, त्यानंतर मुख्यमंत्री झालेल्या करुणानिधी यांचे संपूर्ण राजकारण आक्रमक ब्राह्मणेतर वादावर अवलंबून राहिले. अलीकडच्या काळात महाराष्ट्रातही ब्राह्मणांच्या सांस्कृतिक वर्चस्वाला धक्का लागला; तसेच तमिळनाडूतही झाले. आता भाजप दक्षिणेकडील राज्यांमध्ये आक्रमक हिंदूत्वाचे राजकारण करू पाहात आहे. नव्या संसद इमारतीत बसवलेला 'सेन्गोल' हे त्याचे एक प्रतीक मानता येईल. भाजपने जर तमिळनाडूसारख्या बहुजनवादाचे राजकारण करणाऱ्या दक्षिणेकडील सर्वात मोठ्या राज्यामध्ये घुसखोरी केली आणि पुन्हा ब्राह्मणवाद ऐरणीवर आला, तर बहुजनांना नवी लढाई लढावी लागेल. शिवाय, तिथल्या ७० टक्के ओबीसींना भाजपने आकर्षित केले तर प्रादेशिक पक्षांसमोर गंभीर आव्हान उभे राहू शकते. त्याआधीच 'द्रमुक'ने सनातन धर्मावर हल्लाबोल करून अचूक ढाल भाजपसमोर उभी केलेली आहे. 'द्रमुक'ने टाकलेल्या डावपेचाचा व्यापक राजकारणासाठी आता कसा वापर करून घ्यायचा हे पूर्णत: 'इंडिया'तील घटक पक्षांवर अवलंबून असेल.

भाजपेतर 'इंडिया' आघाडीचा 'द्रमुक' महत्त्वाचा घटक पक्ष आहे, तमिळनाडूमध्ये द्रमुक आणि काँग्रेसची आघाडी झालेली आहे. तिथे अण्णाद्रमुक आणि भाजपच्या युतीविरोधात सत्ताधारी आघाडीला लढावे लागणार आहे. 'हिंदू धर्म संपवण्यासाठी 'इंडिया'ची स्थापना झाल्याची आवई भाजपने उठवली आहे. त्यातून 'इंडिया' हिंदूविरोधी असल्याचे भासवण्याची अत्यंत चतुर मांडणी करून भाजपने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण केला आहे. त्यामुळे काँग्रेससह 'इंडिया'तील इतर घटक पक्ष बावचळून गेले आहेत. म्हणून काँग्रेसची भूमिकाही तळ्यात–मळ्यात असल्याचे दिसते. मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ या उत्तरेकडील राज्यांमध्ये विधानसभा निवडणूक तोंडावर आली असताना आपण हिंदूविरोधी असल्याचे चित्र उभे राहिले तर राजकीय नुकसान होईल या भीतीने काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी 'सनातन'च्या वादावर भूमिका घेणे टाळले आहे. 'द्रमुक'ने सनातन धर्मावर केलेला प्रहार 'इंडिया'साठी अडचण ठरेल की भाजपविरोधात लढण्याचा नवा मार्ग दाखवेल, हे सर्वस्वी 'इंडिया'तील घटक पक्षांवर अवलंबून असेल.

भाजपला केंद्रात सत्ता मिळण्यामागे अनेक कारणे असू शकतील; पण हिंदूत्वाच्या मुद्द्यावरून झालेले ध्रुवीकरण हे प्रमुख कारण होते. भाजप हाच हिंदू धर्माचा एकमेव रक्षक असल्याचे सांगितले गेले. काँग्रेस वा इतर घराणेवादी पक्ष हिंदूविरोधी आणि मुस्लीम अनुनयवादी असल्याचा प्रचार केला गेला. 'सनातन'च्या निमित्ताने त्याची पुनरावृत्ती होताना दिसते आणि लोकसभा निवडणुकीआधी भाजपकडून हा मुद्दा अधिक तीव्र होऊ शकतो. पण, त्यापूर्वी 'इंडिया'ला या वादात उघडपणे हस्तक्षेप करावा लागू शकतो. भाजपने सनातन धर्मासंदर्भात केलेली मांडणी आणि 'द्रमुक'ने सनातन धर्मातील अपप्रवृत्तीवर केलेला प्रहार या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या आहेत. सनातन धर्म म्हणजे हिंदू धर्मावर कोणालाही टीका करून दिली जाणार नाही अशी भूमिका भाजपने घेतली आहे. पण 'द्रमुक'ने सनातन धर्मातील धर्माधपणावर, जातिव्यवस्थेवर, असमानतेवर, धर्माअंतर्गत होणाऱ्या अत्याचारावर आणि अन्यायावर बोट ठेवले आहे. 'द्रमुक'ची भूमिका धर्मामध्ये सुधारणा घडवून आणण्याची असेल तर, भाजपने तरी त्याला विरोध कशासाठी करायचा, हा प्रश्न विचारणे वावगे ठरणार नाही. संघानेदेखील अनुसूचित जाती–जमातींना दिलेल्या आरक्षणाचे समर्थन केले आहे. दोन हजार वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला, त्यांना न्याय देण्यासाठी दोनशे वर्षे आरक्षण दिले तर सवर्णांनी ते सहन केले पाहिजे, असे सरसंघचालक मोहन भागवत यांनी नागपूरमधील भाषणात सांगितले आहे. संघ सुधारणावादी भूमिका घेत असेल तर भाजपनेही सुधारणांना पाठिंबा दिला पाहिजे असे 'इंडिया' म्हणू शकतो. 'इंडिया'तील घटक पक्षांतील कुणीही ना हिंदू धर्मावर टिप्पणी केली, ना धर्माला नाकारले. त्यातील सुधारणांचा कोणी उल्लेख केला असेल तर चुकीचे काय, असेही 'इंडिया'कडून विचारले जाऊ शकते. भाजपेतर पक्ष हिंदूविरोधी असल्याच्या भाजपच्या अपप्रचारामुळे विरोधकांना २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मोठी किंमत मोजावी लागली होती. आता हा राजकीय परीघ भाजपने पुन्हा काबीज करू नये, याची दक्षता 'इंडिया' कदाचित घेण्याची शक्यता आहे. हिंदूविरोधी नव्हे तर सुधारणावादी असल्याचे 'इंडिया'ने भाजपला ठणकावून सांगायला सुरुवात केली तर 'सनातन' वादाची दिशा बदलू शकेल.

# तिरंदाजांना नव'दृष्टी'

आदिती स्वामी आणि ओजस देवताळे हे खेळाडू यंदा तिरंदाजीत जगज्जेते ठरले. त्यांना खेळण्याची 'दृष्टी' दिली ती साताऱ्याच्या 'दृष्टी आर्चरी ॲकॅडमी'ने. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत प्रशिक्षक प्रवीण सावंत यांनी स्थापन केलेली ही संस्था ग्रामीण भागातील तिरंदाजांसाठी आशेचा किरण ठरली आहे.

प्रवीण सावंत. सातारा जिल्ह्यातील वाढे गावातील तिरंदाजी प्रशिक्षक. प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढणाऱ्या प्रवीण यांचे आयुष्य पारंपरिक कला असलेल्या तिरंदाजी या क्रीडा प्रकाराभोवतीच गुंफले गेले आहे. आपल्याला जे काही करायचे ते तिरंदाजी क्रीडा प्रकारातच, या ध्येयाने ते प्रेरित झाले आहेत. त्यासाठी जगण्याचा त्यांचा धागा बनली आहे ती 'दृष्टी'. प्रवीण यांनी जन्माला घालून भव्यतेचे स्वप्न पाहिलेली प्रशिक्षण संस्था. प्रवीण यांनी आपले आयुष्य या संस्थेसाठी आणि संस्थेतून घडणाऱ्या गुणवान तिरंदाजांसाठी वाहिले आहे. प्रवीणच्या घरची परिस्थिती बेताची. कुटुंबाचा भार वडिलांच्याच खांद्यावर पडल्याचे प्रवीण यांनी लहानपणापासूनच पाहिले होते. त्यामुळेच वयात आल्यावर काहीतरी वेगळे करण्याचा विचार प्रवीण यांनी केला. सातारा भूमीत धनुष्यबाण त्यांच्या नजरेत पडले. कानावर येणाऱ्या गोष्टी आणि दूरचित्रवाणीवर पाहिलेल्या धनुर्विद्या या खेळाची माहिती घेतली. साताऱ्यातील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात असताना सकाळी वाईत चंद्रकांत पिसे यांच्याकडे सरावही सुरू केला. दुपारी महाविद्यालय आणि संध्याकाळी पोळ रुग्णालयात आरोग्यसेवकाची नोकरी, असा त्यांचा दिनक्रम होता. घरची परिस्थिती बेताची असताना प्रवीण हे काय करतोय, असे त्याच्या कुटुंबीयांना वाटायचे. पण, आज आई–वडिलांना आपल्या मुलाचा अभिमान वाटतोय. आपल्या मुलाच्या हातून दोन जगज्जेते खेळाडू घडले, हे आई वंदना आणि वडील परबती सांगतात तेव्हा त्यांचे डोळेच अधिक बोलतात.

तिरंदाजी खेळाच्या सरावातून अनुभव मिळू लागला, तशी प्रवीण यांची धडपड आणि यशाची भूकही वाढू लागली. अर्थात त्या वेळी फारशा सुविधाही उपलब्ध नव्हत्या. शाहू स्टेडियमच्या मुलींच्या वसतिगृहाच्या मागे प्रवीण यांचा सराव सुरू झाला होता. राष्ट्रीय शालेय स्पर्धेत पदक मिळाल्याने तेव्हा गावात त्यांच्या नावाची चर्चा होती. त्यांना धनुष्यबाण खेळताना पाहून साताऱ्यातील अन्य मुलेही 'ए मला शिकव ना.. दादा मला पण..' असा आग्रह धरू लागली. आपला सराव सुरू ठेवत प्रवीण यांनी या मुलांनाही शिकवायला सुरुवात केली. शिकवण्याचा हट्ट धरणाऱ्या मुलांची संख्या वाढू लागली.

या मुलांना शिकवत असताना तिरंदाजी खेळातच खेळाडू म्हणून कारकीर्द घडवण्याची इच्छा प्रवीण यांच्या मनावरून केव्हाच पुसली गेली. सहकाऱ्यांना शिकवता शिकवता ते स्वत:तील खेळाडू विसरले, पण त्यांच्यातील प्रशिक्षक केव्हा जागा झाला, हे त्यांनाच कळले नाही. कुठलेही मानधन नाही, की शुल्क नाही. प्रवीण यांनी या मुलांना तिरंदाजी शिकविण्याचा वसा घेतला. यादरम्यान चरितार्थ चालवण्यासाठी प्रवीण पोलीस भरतीची जाहिरात पाहून तिथे परीक्षेला जाऊन आले. मुलांना विनामानधन शिकवून पोटाची खळगी भरता येणार नव्हती. प्रवीण यांचा पोलीस भरतीचा प्रयत्न यशस्वी झाला. पोलीस सेवेत दाखल होऊन त्यांनी कुटुंबाचा चरितार्थ चालवतानाच तिरंदाजीच्या प्रशिक्षणाचे काम सुरूच ठेवले. काम सांभाळून प्रशिक्षणाची तारेवरची कसरत प्रवीण करीत होते. मुलांची संख्या वाढल्यावर प्रवीण यांनी आपला मुक्काम काँग्रेस कमिटी भवनच्या मागे असलेल्या मैदानावर हलवला. पुढे हे मैदानही अपुरे पडू लागले. मग साताऱ्याजवळील सैदापूर येथील गुजर हॉस्टेलच्या मैदानात प्रवीण आणि त्याच्या तिरंदाजांचे पथक येऊन धडकले. दर एक–दोन वर्षांनी प्रवीण यांना हा मांडलेला दुसरा संसार हलवावा लागत होता. अशा वेळी पोळ हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सेवेचे दुकान असणारे महेंद्र कदम पुढे आले. त्यांची मुलगीही प्रवीण यांच्याकडे शिकायला येत होती. प्रवीण यांची धडपड, तळमळ ते पाहत होते. साताऱ्यापासून जवळच असलेल्या गावात आपली शेतजमीन मोकळी करून त्यांनी प्रवीण यांना दिली. आपल्यामागे कोणीतरी उभे राहिल्याने प्रवीण प्रोत्साहित झाले आणि जन्म झाला दृष्टी तिरंदाजी प्रशिक्षण संस्थेचा.

याचदरम्यान अवघ्या जगाला हादरवून टाकलेल्या करोना महासाथीच्या संकटाचे प्रतिकूल परिणाम प्रवीण यांच्या वाटचालीवर होऊ लागले. खेळाडूंची संख्या रोडावू लागली. मैदानाच्या देखभालीचा खर्च मात्र कमी होत नव्हता. त्या वेळी पुन्हा महेंद्र कदमच प्रवीण यांच्या पाठीशी उभे राहिले. त्यांनी प्रवीण यांच्याकडून एकही पैसा घेतला नाही. त्यामुळे प्रवीण तग धरून राहू शकले. जेव्हा काही नव्हते, तेव्हा या खेळाने आणि अकादमीने प्रवीण यांना साथ दिली.

प्रशिक्षणासाठी मुलांची संख्या वाढत असताना आजही प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षणासाठी येणाऱ्या मुलांकडून प्रशिक्षण शुल्क घेतले जात नाही. या मुलांकडून केवळ मैदान देखभालीसाठीचा खर्च घेतला जातो. पिण्यासाठी शुद्ध पाणी, खेळाचे साहित्य ठेवण्यासाठी शेड, मैदानाच्या भोवतीची भिंत, रोज साहित्याची ने–आण करू न शकणाऱ्या मुलांचे साहित्य ठेवण्यासाठी स्टोअर रूम अशा सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. अकादमीत आता बाहेरून येणाऱ्या मुलांची संख्या वाढू लागली आहे. या मुलांची काळजी घेण्यासाठी स्वत: प्रवीण आणि त्यांची पत्नी सायली कुठलीही कसर सोडत नाहीत. मुलांना एकटे वाटू नये, ही त्यामागची भावना असल्याचे प्रवीण सांगतात. या सगळ्यासाठी नाममात्र एक हजार रुपये मुलांकडून घेतले जातात. काही मुले ही रक्कमही देऊ शकत नसतील, तरी त्या मुलांनाही प्रशिक्षण संस्थेत सामावून घेऊन शिकवले जाते.

तिरंदाजीतील कम्पाऊंड प्रकारातून आजपर्यंत खेळाडू घडले. जगज्जेते आदिती आणि ओजस याच क्रीडा प्रकारातील खेळाडू. ऑलिम्पिक प्रकार असलेल्या रिकव्हसाठी प्रवीण हे सध्या प्रयत्नशील आहेत. त्या दृष्टीने चंडीगडमधील अनुराग कमल हे प्रशिक्षक महिन्यातील पाच दिवस येथे मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी येतात आणि उर्वरित दिवस प्रवीण मुलांकडून सराव करून घेतात. अनुराग यांचे प्रत्येक मुलासाठी सात हजार रुपये शुल्क आहे, पण प्रवीण यांची जिद्द आणि काम पाहून ते त्यांच्याकडून मानधन घेत नाहीत. कमल यांचे शुल्क आणि निवासाचा खर्च प्रशिक्षण घेणाऱ्या मुलांचे पालक मिळून करतात. तिरंदाजी खेळ हा वरकरणी धनुष्य–बाणाचा वाटत असला, तरी त्याचा पसारा मोठा आहे. धनुष्य, बाण, ताण आणि बरोबरीने आवश्यक असलेले साहित्य तेवढे परवडणारे राहिलेले नाही. भारतीय गट, रिकव्ह, कम्पाऊंड अशा तीन प्रकारांतील एका खेळाडूचा साहित्याचा खर्च ८ हजारांपासून चार लाखांपर्यंत आहे. अलीकडे लाकडाचे साहित्य लोप पावले असले, तरी धातूचे साहित्य प्रचलित झाले आहे.

अनेकदा प्रयत्न करूनही त्यांना शासनाकडून काहीही मदत मिळालेली नाही. पोटाला चिमटा काढून सावंत कुटुंबीय मुलांना खेळण्याची दृष्टी देत आहेत. अगदी सुरुवातीला सायली आणि प्रवीण यांच्या आईने दागिने गहाण ठेवून निधी उभा केला. वाढणारा खर्च पतसंस्थेतून कर्ज घेत भागवला. मोबाइल आणि संगणकीय खेळात अडकून राहिलेल्या पिढीला मैदानाकडे वळवण्याची दृष्टी देण्यात सावंत कुटुंबीय यशस्वी होत आहेत. 'दृष्टी भक्कम होण्यासाठी आधाराची गरज आहे. अधू झाल्यावर शस्त्रक्रिया करून उपयोग नसतो. त्यामुळे शस्त्रक्रिया करावीच लागू नये इतके बळ मला ईश्वराने द्यावे आणि माझ्याकडून आदिती, ओजस यांच्यासारखे देशाला पदक मिळवून देणारे आणखी तिरंदाज घडावेत,' अशी भावना प्रवीण व्यक्त करतात.

स्वत: प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत उभे राहिलेले प्रवीण देशासाठी तिरंदाज घडवण्यासाठी धडपड करत आहेत. आंतरराष्ट्रीय पदक मिळवण्यासाठी सुसज्ज सोयीसुविधा लागतात आणि त्या सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी खर्च करावा लागतो. आतापर्यंत कसेबसे निभावून नेलेल्या प्रवीण यांची खर्च करण्याची क्षमता नाही. त्यासाठी त्यांचे हात बळकट करण्याची गरज आहे. – ज्ञानेश भुरे

संस्थेपर्यंत कसे जाल?

दृष्टी प्रशिक्षण संस्था ही वाढे या गावी आहे. सातारा बस स्थानकापासून हे गाव चार किलोमीटरवर आहे. या गावी जाण्यासाठी बस किंवा खासगी वाहतूक व्यवस्था उपलब्ध आहे.

# शैक्षणिक संस्थांनी शिक्षणच द्यावे..

भारतात लोकांची मानसिकता व धर्मांधता एवढी वाढली आहे की येथे सत्य बोलले तर धर्मविरोधी म्हणून त्याचा द्वेषच केला जात नाही तर दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश अशा विद्यानवादी लोकांची हत्या केली जाते. बंदुकीच्या गोळीपेक्षा लेखणीची भिती आजही आहे. विषमतावादी व अंधविश्वासाची व्यवस्था टिकवून राहण्यासाठी अनेक विषमतावादी लोक ज्यांना विषमतेच्या व धर्माच्या आडून आपले पोट भरायचे आहे असे लोक नेहमीच लोकांच्या डोक्यात अज्ञान पेरून त्यांना भावनिक बनवून त्याला धर्माचे वलय देऊन माणसिक गुलाम बनवले जाते. आणि याच माणसिक गुलाम लोकांचा फायदा अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी पसरवून स्वतः चे दुकान चालावे म्हणून धर्माचे दुकानदार लोकांना जागृत होऊ देत नाहीत. धर्माचे दुकानदार लोकांना हक्क अधिकार यांच्या विषयी जागृत होऊ देत नाहीत, शिक्षणाचे महत्त्व न सांगता काल्पनिक बाबी डोक्यात टाकुन लोकांना अज्ञानातच ठेवले जाते. शिवाय अशाच लोकांकडून सामाजिक द्वेष व अशांतता निर्माण होईल अशा प्रकारचे कृत्य केले जाते. देशातील सामाजिक व राजकीय परिस्थिती भावनिक व धार्मिक बनत असताना यावर एकच उपाय आहे तो म्हणजे शिक्षण. शिक्षणाने लोक जागृत होऊन हक्क अधिकाराची मागणी करून सत्तेतील वाटा माघत असतात. सामाजिक समस्येवर आवाज उठवून सरकारला प्रश्न विचारत असतात. परंतु मागील काही वर्षांपासून शैक्षणिक संस्था अंधविश्वास व पाखंड याला महत्त्व देऊन वादाचे मुद्दे निर्माण करत आहेत. शैक्षणिक संस्थांनी निरपेक्ष राहुन विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन विद्यानवादी, तर्कवादी व प्रयत्नवादी बनवण्या ऐवजी अंधविश्वासामध्ये ढकलून दिले जात आहे आणि शैक्षणिक संस्था ही धर्म निरपेक्ष असताना तेथे धार्मिक वातावरण निर्माण करून धर्मामध्ये भेद करण्याचे काम सुरू केले आहे. मुळात शैक्षणिक संस्थानी फक्त धर्मनिरपेक्ष राहुन योग्य ते शिक्षण देऊन भविष्यासाठी वैद्यानिक, कुशल अधिकारी व जागृत नागरिक बनवणे आवश्यक असताना ही केवळ काही धार्मिक कार्यक्रम शाळेमध्ये साजरे करून शैक्षणिक संस्थेला धार्मिक संस्था बनवण्याचे काम सुरू आहे. आपा–पला धर्म प्रत्येकाला प्रिय असतो. काही काही लोक तर धर्म वेडे असतात. धर्माच्या नावाखाली किती ही चुकिच्या गोष्टी ते स्विकारतात व आपल्या धर्मातील इतरही लोकांवर त्या बंधनकारक करतात. परंतु शैक्षणिक शिक्षण संस्थेमध्ये सध्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता पुर्ण शिक्षणाच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन देणे हे शिक्षण संस्थेचे काम असते. परंतु शिक्षण संस्थाच जर एकाच धर्माला महत्त्व देऊन एकाच धर्मातील अंधविश्वासाला पुरक व वाद निर्माण होतील अशा बाबी साजऱ्या करत असतील तर त्यांना शिक्षण संस्था म्हणायचे का? जसे मागच्याच आठवड्यात अनेक शाळांमध्ये दहीहंडी कार्यक्रम साजरा केला गेला. या कार्यक्रमासाठी अनेक शैक्षणिक संस्थांनी आपल्याच विद्यार्थ्यांपार्फत दहिहंडी साठी लागण–ारे लहान मोठे साहित्य गोळा करून तो कार्यक्रम शैक्षणिक संस्थेत साजरा केला गेला. शैक्षणिक संस्थेमध्ये वेगवेगळ्या जाती धर्माचे विद्यार्थी असतात. परंतु ते सर्व एकत्र फक्त आणि फक्त शिक्षण या मुद्यांवर आलेले असतात. सर्व धर्माचे लहान विद्यार्थी एकत्र आल्यानंतर एकाच धर्माला महत्त्व देऊन तो धार्मिक कार्यक्रम शैक्षणिक संस्थेत साजरा होत असेल तर त्या लहान मनावर काय परिणाम होईल याचा विचार पालकवर्ग व शैक्षणिक संस्था चालक आणि ज्यांनी योग्य मार्ग दाखवावा अशा शिक्षकांनी कधी केला का? आता गणेशोत्सव सुरू होत आहे. गणेशोत्सव साजरा करण्यासाठी अनेक शैक्षणिक संस्था सज्ज झाल्या आहेत. लहान लहान विद्यार्थ्यांच्या पालकांना गणेशोत्सव करायचा म्हणून वर्गणी देखील मागितली जात आहे. गणेशोत्सव हा धार्मिक उत्सव शैक्षणिक संस्थेमध्ये साजरा करणे कितपत योग्य आहे? बर दहीहंडी, गणेशोत्सव सारखे धार्मिक उत्सव साजरे करून विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर शिक्षक लोक नेमके काय बिंबवणार आहेत? धर्माचे पालन, उपासना करण्याचा अधिकार सर्वांना भारतीय संविधानाने दिलेला आहे. परंतु तो शासकीय पातळीवर नाही तर वैयक्तिक पातळीवर करू शकतो. ज्यांना गणेशोत्सव साजरा करायचा त्यांनी खुशाल आपापल्या घरी चौका चौका चौकात खुशाल साजरा करावा. परंतु शैक्षणिक संस्था हे एकाच धर्माचे धार्मिक कार्य, उपासना करण्याचे ठिकाणी मुळीच नाही. शैक्षणिक संस्थेमध्ये वेगवेगळ्या जाती धर्मातील विद्यार्थी भारतीय म्हणून शिक्षण घेण्यासाठी येतात तेथे त्यांना शिक्षणच मिळणे आवश्यक असते. एकाच धर्माचे सन उत्सव साजरे करून शैक्षणिक संस्था चालक व शिक्षक यांनी धार्मिक भेद करू नये. जर शैक्षणिक संस्थेमध्ये धार्मिक सन उत्सव साजरे करता तर सर्वच धर्माचे करायला पाहिजे. मग ज्या शिक्षण संस्था दहिहंडी, गणेशोत्सव साजरा करतात त्या संस्था ईदच्या दिवशी नमाज पठण करणार का? दुसरी गोष्ट म्हणजे दहिहंडी कृष्ण व गणेशोत्सव गणपती हे दोन्हीही बौद्ध धम्म नाकारतो. मग दहीहंडी व गणेशोत्सव शैक्षणिक साजरा करताना हा त्या धम्माचा अवमान नाही का? म्हणजे एका धर्माला महत्त्व देताना दुसऱ्या धर्माला, त्यांच्या विचार सरणीला न जुमानने हे धर्मनिरपेक्ष चे लक्षण आहे का? अशा मुद्यावर बोलल्या नंतर धर्मांध लोक तर चिडून उठतात परंतु ज्यांना सुशिक्षित व समजदार समजले जाते असेही लोक स्वतः च्या धर्मा बद्दल सत्य गोष्टी ऐकायला तयार न होता सत्य बोलणाऱ्याच्या विरोधात उभे राहतात. शैक्षणिक संस्थेमध्ये एकाच धर्माचे आणि अंधविश्वासाला पुरक असे सन साजरे करताना इतर धर्माचा अवमान केला जातो, आणि यावर कोणी बोलले तर वाद निर्माण होतो हे माहीत असूनही जाणीव पुर्वक हे कृत्य करण्या मागचा उद्देश काय? हे कृत्य करणे म्हणजे जाणीव पुर्वक आपला धर्मातील चुकिच्या चालीरीती आणि अंधविश्वास इतरांवर लादणे नव्हे का? इतर धर्मातील विचार व सन उत्सव साजरे करणे जमत नसेल तर दहिहंडी, गणेशोत्सव साजरे करून द्वेष, विषमता निर्माण होईल असे वातावरण का निर्माण केले जाते. राष्ट्रीय महोत्सव जसे स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे ही एवढ्या आनंदी तिव्रतेने साजरे केले जात नाहीत एवढ्या आपुलकी ने हे धार्मिक कार्यक्रम केले जातात. राष्ट्रीय महोत्सव असल्यावर ध्वजारोहण करून घरी जाण्याची घाई असलेल्या शिक्षकांना दहीहंडी आणि गणेशोत्सव साजरा करायला वेळ कसा मिळतो? राष्ट्रभावना, एकी, माणुसकी व माणूस,. बंधुभाव लहान मुलांच्या मनात रूजवण्याच्या वयात जर अंधविश्वास आणि एखाच धर्माबद्दल चा उदोउदो शैक्षणिक संस्था रुजवत असेल तर तेथे गुणवत्ता व आदर्श विद्यार्थी निर्माण कसे होतील. जागतिक शैक्षणिक श्रेणी मध्ये आपण पहिल्या दहा मध्ये नाही ही प्रत्येकासाठी लाजीरवाणी बाब आहे. लोकसंख्या सर्वात जास्त असलेल्या आणि विश्वगुरू बनण्याचे स्वप्न बघणारा देश शैक्षणिक दृष्टीने मागासलेला असेल तर जागतिक पा–तळीवर विश्वगुरू काय पण आपल्याला कोणी लायकही समजणार नाही. याची जाणीव प्रत्येक भारतीय नागरिकांना असायला पाहिजे. धार्मिक कार्यक्रम हे शैक्षणिक संस्थेमध्ये साजरे न करता महापुरुषांचे जयंती कार्यक्रम साजरे करून महापुरूषांनी अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी, विषमता कशी मातीत गाडली व समता बंधुता न्याय व स्वातंत्र्य बहाल करून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला हे विद्यार्थ्यांना पटवून देणे आवश्यक आहे. गणेशोत्सव सार्वजनिक माणुन महापुरूषांना जातीत वाटून त्यांचे विचार व कार्य न वाचणाऱ्या आणि स्वतः शिक्षण घेऊनही महापुरूषांना जातीत बंद करून त्यांचा तिरस्कार करणाऱ्या लोकांच्या मेंदूची किव येते. शिक्षण महात्मा फुले यांनी सुरू करून दिले, आरक्षण शाहु महाराज यांनी दिले, हक्क अधिकार आणि आरक्षणाला व शिक्षणाला संरक्षण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले, आणि हिंदु महिलांच्या माना सन्मानासाठी, हक्क अधिकारासाठी मंत्री पदाचा राजीनामा दिला तरीही ह्या महापुरूषांचे कार्य व विचार समजले नसतील तर आपण बौध्दिक दृष्टीने मागासलेले आहोत हेच सिद्ध होते. सर्वत्र जातीधर्माच्या नावाखाली लोकांमध्ये द्वेष पसरवण्याचे काम सुरू असताना शिक्षकाने भारतीय संविधान समजावून सांगुन भारतीय म्हणून बंधुतेच्या दोरीने बांधायचे काम करणे अपेक्षित असू–नही शिक्षक वर्गच जर धर्माच्या आडून अंधविश्वासाला खतपाणी घालत असतील आणि एकाच धर्माकडे झुकत असतील तर शिक्षणाचा काहीच फायदा झाला नाही असे दिसुन येते. मग ज्या शिक्षकांनाच शिक्षणाचे महत्त्व कळाले नसेल तर ते शिक्षक विद्यार्थ्यांना काय शिक्षण देणार हा मोठा प्रश्न आहे. पगार मिळतो म्हणून हजेरी लावायची याच उद्देशाने शिक्षक शाळेवर जात असतील तर विद्यार्थ्यांची माती झाली म्हणून समजायचे. अर्थात सर्वच शिक्षक किंवा शैक्षणिक संस्था असे करत नाहीत परंतु जे करतात त्यांच्या बद्दल हे बोलत नाहीत हे त्याहूनही घातक आहे. शिक्षक आणि शैक्षणिक संस्था देशासाठी आदर्श व प्रभावशाली संपत्ती निर्माण करत असतात. म्हणून शैक्षणिक संस्थेमध्ये कोणत्याही धार्मिक कार्यक्रमाला महत्त्व न देता. देश, संविधान, राष्ट्रीय प्रतिके, राष्ट्रीय संपत्ती, बंधुता व एकात्मता या बाबींवर ही विद्यार्थ्यांना घडवणे आवश्यक असते. आणि हे सर्व करायचे तर शैक्षणिक संस्थानी शिक्षणच द्यायला पाहिजे. धार्मिक कार्यक्रम केले तर वाद आणि प्रश्न निर्माण होऊन वातावरण दुषीत होत असते. म्हणून शैक्षणिक संस्था व शिक्षकांनी समजदारी व सत्य परिस्थिती बघून शैक्षणिक संस्थेत फक्त शिक्षणच द्यायला हवे. धार्मिक कार्यक्रम तर ज्यांना वाटेल ते घरी करतील त्याची काळजी शैक्षणिक संस्थेने करू नये.

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# गॅस अंशदानाचा बोजा

अनेक दशके बहुतांश सरकारांनी अर्थव्यवस्थेवर लक्ष देण्याऐवजी लोकानुनय धोरण राबविण्यावरच भर दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही प्रचलित पद्धत बदलण्याचा प्रयत्न केला. परंतु व्यावहारिक पातळीवर त्यांना पारंपरिक मार्गावरच यावे लागले. एलपीजी गॅस अंशदान देखील याच श्रेणीत मोडते. २९ ऑगस्ट २०२३ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात २०० रुपयांनी कपात केली आणि ती ३० ऑगस्ट २०२३ पासून लागू झाली. वास्तविक एलपीजीचे मूल्य नियंत्रणमुक्त करण्याची घोषणा केलेली आहे. अशावेळी सरकार असा निर्णय कसा घेऊ शकते? असा प्रश्न पडला आहे.

नेक दशके बहुतांश सरकारांनी अर्थव्यवस्थेवर लक्ष देण्याऐवजी लोकानुनय धोरण राबविण्यावरच भर दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही प्रचलित पद्धत बदलण्याचा प्रयत्न केला. परंतु व्यावहारिक पातळीवर त्यांना पारंपरिक मार्गावरच यावे लागले. एलपीजी गॅस अंशदान देखील याच श्रेणीत मोडते. २९ ऑगस्ट २०२३ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात २०० रुपयांनी कपात केली आणि ती ३० ऑगस्ट २०२३ पासून लागू झाली. वास्तविक एलपीजीचे मूल्य नियंत्रणमुक्त करण्याची घोषणा केलेली आहे. अशावेळी सरकार असा निर्णय कसा घेऊ शकते? असा प्रश्न पडला आहे.

देशांतर्गत ग्राहकांसाठी तीन प्रमुख तेल मार्केटिंग पीएसयू गॅसचा पुरवठा करतात. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन आणि हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन. या कंपन्यांचे बहुतांश समभाग केंद्राकडे आहेत आणि त्यांचेच त्यावर नियंत्रण आहे. त्यामुळे सरकार त्यास आदेश देऊ शकते. भाव कमी केल्याचा लाभ एलपीजीच्या ३३० दशलक्ष ग्राहकांना मिळणार आहे. आता दिल्लीत गॅस ११०३ रुपयांऐवजी ९०३ रुपयांना मिळेल. देशभरातील ३३० दशलक्ष घरगुती ग्राहकांपैकी ९६ दशलक्ष ग्राहक प्रधानमंत्री उज्ज्वला योजना पीएमयूवायच्या अंतर्गत येतात. या योजनेच्या माध्यमातून केंद्र सरकार मोफत गॅस कनेक्शन देते. त्यांना दरवर्षी पहिल्या बारा सिलिंडरसाठी २०० रुपये प्रति सिलिंडर अंशदान दिले जाते. आता नव्या निर्णयानुसार त्यांना बाजारमूल्यापेक्षा ४०० रुपये कमी मोजावे लागतील. यानुसार दिल्लीत या लाभार्थ्यांसाठी एका सिलिंडरची किंमत ७०३ रुपये असेल. यादरम्यान सरकारने अतिरिक्त ७.५ दशलक्ष आणखी नवे कनेक्शन पीएमवायअंतर्गत जारी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे लाभार्थ्यांची एकूण संख्या १०३.५ दशलक्ष होईल.

'एलपीजी'वरचे अंशदान हे पुरवठाखर्चाव्यतिरिक्त आहे. यात रिफायनरी गेट प्राईस किंवा आरजीपीबरोबरच भाडे, मार्केटिंगचा खर्च, मार्केटिंगमधील फायदा, डीलरचे कमिशन, टॅक्स आणि ड्युटी याचा समावेश आहे. त्याचा उद्देश केवळ गरीब घरगुती ग्राहकांना मदत करणे हा होता. जेव्हा लाभार्थी आपल्या पायावर उभे राहतील, तेव्हा ते अंशदान बंद करतील अशी अपेक्षा ठेवण्यात आली होती. मात्र मागील काळातील सरकारने या मूलभूत सिद्धांताकडे दुर्लक्ष करत सर्वच एलपीजी कनेक्शनवर अंशदानाची सवलत दिली. एवढेच नाही तर श्रीमंतांसह सर्व लोकांनी त्याचा लाभ घेतला. अर्थात हे अंशदान गरीब लोकांनाच मिळणे अपेक्षित होते.

२०१५–१६ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागात ०.०७ टक्के एलपीजी अंशदान हे गरीब कुटुंबांमधील पाचव्या टप्प्यापर्यंतच पोचते. याच रितीने शहरी भागातही सर्वांत गरीब कुटुंबापैकी पाचव्या टप्प्यापर्यंत ८.२ टक्के अंशदान मिळत होते. व्यापक प्रमाणात अंशदानाचा लाभ अनेकांनी बनावट पद्धतीने मिळवला. कारण एलपीजी गॅस सिलिंडरच्या कर्मचा–यांचा एक गट हॉटेल, रेस्टॉरंट आणि अन्य ठिकाणी सिलिंडर पोचवण्याचे काम करत होता. तार्किक रूपाने निर्णय घेण्याऐवजी लोकानुनय निर्णय घेण्याच्या प्रथेमुळे राजकीय नेते अंशदान देत होते. केंद्राच्या ताळेबंदावर कोणताही आर्थिक ताण न देता मार्ग काढत होते. सुरुवातीला पेट्रोल, डिझेल, केरोसीन आणि एलपीजीवर दिल्या जाणा–या अंशदानाची भरपाई अन्य उत्पादने जसे की फ्युअल ऑईल, एलएसएचएस, नेप्था, एटीएफ आदींवर जादा किंमत आकारून केली जात होती. त्यामुळे बजेटवर कोणताही ताण पडत नव्हता.

२००२–०३ मध्ये वाजपेयी सरकारने ही व्यवस्था बंद करून अंशदानाची तरतूद थेट बजेटमध्येच केली. यामागचा उद्देश टप्प्याटप्प्याने अंशदानाची सवलत बंद करणे. २००४ मध्ये केंद्रातील यूपीए सरकारने अंशदान सुरू ठेवताना पीएसयूला तेलबाँड जारी केले. याशिवाय ओएनजीसी आणि इंडियन ऑईलला देशांतर्गत कच्च्या तेलाच्या विक्रीला परवानगी देणे यासारखे मार्ग काढले. यामागचा उद्देश स्वस्त उत्पादने विकण्यासाठी आयओसीएल, बीपीसीएल, एचपीसीएलला मदत करणे. जून २०२० मध्ये पेट्रोल आणि त्यानंतर नोव्हेंबर २०२० मध्ये डिझेल मूल्यांना नियंत्रणमुक्त केले. एलपीजीचा मुद्दा येतो, तेव्हा केळकर समितीने २०१२–१३ पर्यंत २५ टक्के आणि नंतर दोन वर्षांत ७५ टक्के अंशदान बंद करण्याची शिफारस केली. मे २०१४ मध्ये सत्तेत आलेल्या मोदी सरकारने या शिफारशींवर नियोजनबद्धरीतीने अंमलबजावणी करण्याची घोषणा केली.

१ जानेवारी २०१५ रोजी अंशदानासाठी डीबीटी (थेट लाभ हस्तांतर योजना) योजना सुरू केली. डीबीटीअंतर्गत पीएसयू लाभार्थींना तेल पूर्ण किमतीने दिले जात होते. त्यानंतर लाभार्थ्यांच्या खात्यात अंशदान जमा केले जात होते. या बदल्यात कंपन्या अंशदानाची रक्कम सरकारकडे मागत होती. त्यामुळे बनावट लाभार्थ्यांची संख्या कमी होण्यास मदत झाली. जून २०२० मध्ये सरकारने अंशदान देण्यास बंद केले. मात्र हा निर्णय योग्य होता का? तो निर्णय तार्किक नव्हता. कारण २०२०–२१ च्या अर्थसंकल्पात ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. वास्तविक त्यावर्षी कोरोनामुळे आंतरराष्ट्रीय बाज–ारातील किंमतीत घसरण झाली होती आणि संपूर्ण खर्च आकारूनही सिलिंडरची किंमत ६०० रुपये झाली होती. यानुसार अंशदानाची कोणतीही गरज नव्हती. परंतु त्यावेळी अर्थसंकल्पात तरतूद करण्याचा उद्देश हा बहुतांश तेल पीएसयूची थकबाकी भरणे आणि पीएलयूवायअंतर्गत मोफत कनेक्शन देण्याचे होते.

२०२१–२२ मध्ये कोरोनात घसरण झाली आणि मागणी पूर्वीच्या स्थितीत आली तेव्हा एलपीजीच्या किमती ९०० रुपयांवर पोचल्या. या कारणामुळे सरकारला अंशदान द्यावे लागले. पण यात बदल करण्यात आला. हा लाभ केवळ उज्वला योजनांच्या लाभार्थ्यांना देण्यात आला. या निर्णयामुळे गरिबांना दिलासा मिळाला आणि अन्य मंडळींना वंचित ठेवले. सरकारने त्यावर्षी १४ हजार कोटी रुपये खर्च केले. २०२२–२३ या काळात सरकारने या योजनेनुसार ९१७० कोटी रुपये खर्च केले. मात्र या आकडेवारीतून चित्र स्पष्ट होत नाही. जून २०२० पासून जून २०२२ पर्यंत सरकारने तीन पीएसयू कंपन्यांना एलपीजीची कमी किमतीत विक्री करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे होणा–या भरपाईपोटी २२ हजार कोटी रुपयांचे अनुदान दिले. याला काहीच अर्थ नव्हता. कारण त्यावेळी 'अप्रत्यक्ष' अंशदान केवळ पीएमयूवाय लाभार्थ्यांशिवाय अन्य मंडळींना देखील दिले जात होते आणि तो एक प्रतिगामी निर्णय होता. त्याची दिशा २०२३–२४ मध्ये देखील राहिली.

कच्च्या तेलाच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारात वाढत आहेत. भारताला कच्च्या तेलाच्या आयातीवर जून २०२३ मध्ये ७५ डॉलर प्रति बॅरल खर्च करावा लागत होता. सध्याच्या काळात ९० डॉलर प्रति बॅरल खर्च करावा लागत आहे.

# शेतकऱ्यांशी निगडित सर्व संस्था मजबुत करणार – आ अभिमन्यू पवार

औसा – शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी जे जे माझ्या अखत्यारीत होते ते करण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी केला शेतकऱ्यांच्या शेतीमालास चांगला भाव मिळेल तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही जिल्ह्यातील इतर चांगल्या साखर कारखान्याप्रमाणे सर्वाधिक दर मिळावा हा प्रयत्न करण्यासाठी मी प्रयत्नशील असून शेतकऱ्यांनी हक्काच्या किल्लारीला ऊस व हक्काच्या बाजार समितीला माल आणावा त्याला योग्य दर देण्यासाठी बाजार समिती कटिबद्ध असून गरज पडल्यास राज्यातील मोठे खरेदीदार औशाला आणू औशाच्या बाजार समितीमधून शेतकऱ्यांना उच्चतम भाव देण्याचा मानस आमदार अभिमन्यू पवार यांनी बोलून दाखवला ते (दि.१८) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सर्वसाधारण सभेत बोलत होते.




याप्रसंगी मंचावर औसा बाजर समितीचे सभापती शेखर सोनवणे, उपसभापती प्रा भीमाशंकर राचट्टे,राज्य बाजार समितीचे उपसभापती संतोष सोमवंशी, भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, औसा विधानसभा निवडणूक प्रमुख संतोष मुक्ता, औसा शहरध्यक्ष सुनील उटगे, सदाशिव जोगदंड, सुधीर पोतदार, धनंजय भोसले, संजय कुलकर्णी सचिन आनसरवाडे बाजार समितीचे संचालक प्रवीण कोपरकर, संदिपान लंगर, युवराज बिराजदार, प्रकाश काकडे, अजित धुमाळ, संतोषी अशोक वीर, राधाकृष्ण जाधव, रमाकांत वळके, गोविंद भोसले, ईश्वर कुलकर्णी, मोहन कावळे, विकास नरहरे, सुरेश औटी, धनराज जाधव,चंद्रकला पुरुषोत्तम झिरमिरे, शंकर पुंड व्यापारी असोसिएशन चे अध्यक्ष बाळासाहेब झंवर आदीसह शेतकरी, व्यापारी व हमाल बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.आमदार अभिमन्यू पवार पुढे बोलत होते की औशाच्या विकासाची गाडी केवळ रस्ते, इमारती नव्हे तर या भागातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या मजबूत कसा होईल या दुष्टीने गेल्या चार वर्षांपासून आपल्या शेतीशी निगडित शेतरस्ते तसेच संकट सापडलेल्या शेतकऱ्यांना शासन दरबारी मदत मिळवून देणे या महत्वपूर्ण बाबींसोबतच शेतीला जोडधंदे सक्षम व्हावा म्हणून फळबाग लागवड, दुग्ध व्यवसाय याचबरोबर अन्य व्यवसायासाठी जे काही करता येईल ते आपण करीत आहोत याचे निश्चितच सकारात्मक परिणाम दिसून येणार आहेत. औसा एमआयडीसी मध्ये उद्योजकांची गरज लक्षात घेता जे काही करणे अपेक्षित होते वीज पाणी रस्ते याचे वाढीव काम सुरू आहे.जिल्ह्यातील अनेक उद्योजकांना औशाच्या एमआयडीसी मध्ये उद्योगासाठी प्रोत्साहन दिले असल्याचे सांगून शेती व्यवसाय आधारित उद्योग लवकरच सुरू करण्याचा आपला प्रयत्न आहे. अनेक वर्षांपासून बंद किल्लारी येथील साखर कारखाना अनेक अडचणींनाचा सामना करून माझे दैवत देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे सुरू करण्यात मला यश मिळाले हा कारखाना दुप्पट क्षमतेने गाळप करून शेतकर्यांना जिल्ह्यात सर्वाधिक दर देणारा कारखाना म्हणून नावारूपाला आणायचा आपला संकल्प आहे. यासाठी शेतकऱ्यांनी आपला ऊस किल्लारीला तर शेतीमाल औशाच्या बाजार समितीमध्येच आणावे असे आवाहन केले त्यांनी केले.

बाजार समितीच्या पायाभूत सुविधा

औशाच्या बाजार समितीमध्ये पायाभूत सुविधांसह अनेक कामे येत्या काही दिवसांत करणार आहोत अंतर्गत रस्ते कामासाठी १ कोटी शौचालय कामासाठी २५ लाख तर बाजार समितीला येणारा मुख्य रस्ता या कामासाठी १ कोटी ७ लाख रुपये मंजूर करून घेतला असून हा रस्ता जड वाहतूक लक्षात घेता मजबूत करण्यात येणार आहे मागच्या संचालक मंडळाने बाजार समितीच्या उन्नतीसाठी चांगले काम केले असून जिल्ह्यात औशाची बाजारपेठ एक क्रमांकावर घेऊन जाण्यासाठी संचालक मंडळ घेऊन जाईल यासाठी लागणारे सर्व सहकार्य आपण करणार असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त व्याख्यान संपन्न

मुरुड /महेंद्र आल्टे : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त संभाजी महाविद्यालयात प्रा. डॉ. जयद्रथ जाधव (शिवाजी महाविद्यालय, रेणापूर) यांचे व्याख्यान संपन्न झाले. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अनंत पिडगे होते. तर समाज जागृती शिक्षण संस्थेचे सचिव एडवोकेट व्ही. वाय. पाटील यांची विशेष उपस्थिती होती. तसेच या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक मा. फुलचंद हिंगले, मा. दीपक पटाडे, यांचीही उपस्थिती होती. प्रमुख वक्ते म्हणून बोलताना डॉ. जयद्रथ जाधव म्हणाले की, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला, पण त्यावेळी संपूर्ण देश विविध संस्थानांमध्ये विखुरलेला होता. त्यावेळच्या ५६५ पैकी ५६२ संस्थांनांनी स्वतंत्र भारतात सामाविष्ट होण्याची संमती दर्शविली आणि तशी कार्यवाही केली. मात्र हैदराबाद संस्थान, जम्मू आणि काश्मीर आणि जुनागड संस्थान ही तीन संस्थाने स्वतंत्र भारतात सामाविष्ट झाली नव्हती. हैदराबाद संस्थानावर निजाम मीर उस्मान अली खान यांचे राज्य होते. हैदराबाद संस्थानावर तब्बल सहा पिढ्यांपासून निझाम वंशाचे राज्य होते. त्यांच्या निजामांच्या राज्यातून मुक्त होऊन




भारतीय संघराज्यात सामाविष्ट होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद संस्थानात मुक्ती संग्राम करण्यात आला होता. हा मुक्ती संग्राम सुरू झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रझवी याने रझाकार नावाने मुस्लिम स्वयंसेवकांची भरती केली आणि त्यांच्या साह्याने जनतेवर अमर्याद अत्त्याचार केले. मात्र हा संघर्ष हिंदू – मुस्लिम विरोधी संघर्ष नव्हता तर हा संघर्ष अन्यायाविरुद्ध न्यायाचा होता, असमतेविरुद्ध समतेचा होता. यावेळी डॉ. जयद्रथ जाधव यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामात शहीद झालेल्या अनेक हुतात्म्यांचे संदर्भ देत अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.अनंत पिडगे यांनीही मराठवाडा मुक्ति संग्रामाच्या इतिहासावरती प्रकाश टाकून कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ.एम.एस.बिडवे, प्रा. मधुकर क्षीरसागर, प्रा. एम. बी. गायकवाड, प्रा.ए.व्ही. सुर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मधुकर क्षीरसागर यांनी केले तर आभार आयक्युएसीचे समन्वयक प्रा. एम.बी. गायकवाड यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# आमदार धिरज देशमुख यांनी केली विकासकामांची पाहणी रेणापूर, औसा तालुक्यातील विविध गावांना दिल्या भेटी; ग्रामस्थांशी साधला संवाद

लातूर : रेणापूर तालुक्यातील टाकळगाव, बिटरगाव व तांडा आणि फरदपूर व सेवानगर तांडा तसेच औसा तालुक्यातील टाका व शिवली या गावांना भेट देवून लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. येथील विकासकामांची पाहणीही केली. यावेळी बिटरगाव तांडा येथील सेवा भवनाचे, फरदपूर सेवानगर तांडा येथील महानायक वसंतराव नाईक चौकाच्या नामकरण फलकाचे लोकार्पण व श्री जगदंबा माता मंदिराच्या खुल्या जागेवरील सभागृह बांधकामाचे भूमिपूजन आमदार श्री. धिरज देशमुख यांच्या हस्ते झाले. टाका येथील रस्ते, कुस्तीसाठी तालीम व इतर विकासकामांबाबत पाठपुरावा सुरू आहे, असे त्यांनी आश्वस्त केले. शिवली येथील अतिरिक्त ५ एमव्हीए क्षमतेच्या पॉवर ट्रान्सफार्मर कामाची पाहणी करून हे काम रब्बी हंगामापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी संबंधितांना दिल्या.

यावेळी विजय देशमुख, प्रमोद जाधव, रवींद्र काळे, लालासाहेब चव्हाण, अनंतराव देशमुख, उदय देशमुख, संभाजी रेड्डी, बाबासाहेब गायकवाड, अनंत बारबोले, सदाशिव कदम, उमाकांत खलंग्रे, शेषराव हाके, रमेश सूर्यवंशी,



प्रकाश सूर्यवंशी, विश्वनाथ कागले, अशोक राठोड, उषाताई चोरमले, विठल कदम, अमर वाकडे, गजानन पवार, दशरथ पवार, प्रदीप पवार, अजय राठोड, हंसराज देशमुख, अप्पासाहेब पाटील, हरिभाऊ पाटील, विलास पाटील, रवी पाटील, अजित शिंदे आदी उपस्थित होते.

# त्रिरत्न बौद्ध महासंघ नांदेड यांच्या वतीने अनागारिक धर्मपाल यांच्या १५९ व्या जयंतीनिमित्त जाहीर व्याख्यान

नांदेड :– त्रिरत्न बौद्ध महासंघ नांदेड यांच्या वतीने अनागारिक धर्मपाल यांच्या १५९ व्या जयंतीनिमित्त जाहीर व्याख्यानआयोजित करण्यात आले होते धम्मचारी विरतकुमार, लातूर यांनी अनागारिक धर्मपाल यांच्या बद्दल सखोल व अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. यावेळी तथागत भगवान गौतम



बुद्ध, अनागारिक धर्मपाल, डॉ बाबासाहेब आंबेडकर व उर्गेन संघरक्षितजी यांच्या प्रतिमेचे पूजन धम्मचारी विरतकुमार यांनी केले धम्मचारी पुण्यसेन यांनी पाली पूजा घेतली व मैत्री भावना या साधनेचा सराव करून घेतला तर धम्मचारी प्रज्ञारक्षित यांनी पाहूण्याचा परिचय करून दिला या जयंतीच्या कार्यक्रमासाठी धम्मचारी व धम्ममित्र,धम्म सहाय्यक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते तसेच या कार्यक्रमासाठी नव्यानेच उपस्थित असलेल्या बंधू भगिनींचे स्वागत करण्यात आले.

# स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, टेम्पो चोरीत २ जणांना अटक. चोरलेले १ आयशर टेम्पोसह 3 लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त.

लातूर :– स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, टेम्पो चोरीत २ जणांना अटक. चोरलेले १ आयशर टेम्पोसह ३ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त. या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलिस अधिकारी लातूर शहर भागवत फुंदे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अमलदारांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्याअनुषंगाने सदर पथके चोरीच्या गुन्ह्याच्या माहितीचे संकलन करून तपास करीत असताना दिनांक १४ सप्टेंबर २०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, लातूर शहरातील सारोळा रोड परिसरात एक व्यक्ती समोरच्या



बाजूला क्रमांक नसलेला इटकरी रंगाचा आयशर टेम्पो घेऊन थांबलेला आहे. अशी माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक सारोळा रोड परिसरात येथे पोहोचून बातमीदारने सांगितलेल्या आयशर टेम्पो व टेम्पो जवळ थांबलेल्या व्यक्तीस ताब्यात घेण्यात आले.

त्याला विश्वासात घेऊन विचारपूस केली तेव्हा त्यांनी त्यांचे नाव भरत शंकर चव्हाण, वय ३८ वर्ष, राहणार विलास नगर, लातूर सध्या राहणार करीमनगर लातूर.असे असल्याचे सांगून त्यांच्या ताब्यातील आयशर टेम्पो बाबत विचारपूस करून माहिती घेतली असता सदरचा आयशर टेम्पो हा सद्दाम उर्फ चांदपाशा तांबोळी, वय ३३ वर्ष, राहणार साळे गल्ली, साठ फुटी रोड, लातूर याचे कडून खरेदी केल्याचे सांगितले. सर टेम्पोचे चेसी व इंजिन नंबर वरून तसेच टेम्पोच्या पाठीमागे असलेल्या क्रमांकावरून सदरच्या आयशर टेम्पो बाबत अधिक माहिती घेतली असता अंदाजे चार महिन्यापूर्वी पोलीस ठाणे अहमदपूर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक २७८/२०२३ कलम ३७९, ३४ भादवि प्रमाणे दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील आयशर टेम्पो असल्याचे निष्पन्न झाले.त्यावरून नमूद गुन्ह्यातील आरोपी नामे

भरत शंकर चव्हाण, वय ३८ वर्ष, राहणार विलास नगर, लातूर सध्या राहणार करीमनगर लातूर,

सद्दाम उर्फ चांदपाशा तांबोळी, वय ३३ वर्ष, राहणार साळे गल्ली, साठ फुटी रोड, लातूर.

यांना नमूद गुन्ह्यातील चोरीच्या आयशर टेम्पो सह पोलीस ठाणे अहमदपूर यांचे ताब्यात देण्यात आले असून पुढील कारवाई अहमदपूर पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अमलदार माधव बिल्लापट्टे, नवनाथ हासबे, राजेश कंचे, राजाभाऊ मस्के, तुराब पठाण, जमीर शेख यांनी पार पाडली.

# प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या लाभापासून वंचित ४७८ शेतकऱ्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

लातूर – निलंगा तालुक्यातील चिलवंतवाडी येथील ४७८ शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान योजनेचा लाभ चिलवंतवाडी ऐवजी चनाचीवाडी या गावात ऑनलाइनला चुकीने समावेश करून अपात्र ठरवून शेतकऱ्यांना सदर योजनेच्या लाभापासून वंचित ठेवले आहे. या वंचित शेतकऱ्यांनी लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एन गणेश चतुर्थीला आमरण उपोषण सुरू केले आहे.

जोपर्यंत जिल्हा व तालुका प्रशासन न्याय देत नाही, तोपर्यंत हे आमरण उपोषण सुरूच राहील, असा ठाम निर्णय या उपोषणकर्त्या शेतकऱ्यांनी घेतला आहे. दरम्यान या उपोषणाला लोकाधिकार संघाचे प्रमुख तथा हरंगूळचे माजी सरपंच व्यंकटराव पन्हाळे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. यावेळी अमरकांत कैले, पप्पू तिगिले यांनीही या उपोषणाला पाठिंबा दिला आहे. या उपोषण आंदोलनात ज्ञानोबा मरे, भागवत मरे, निंगरेड्डी मरे, सुभाष मरे, पंडित चिल्लाळे, दयानंद मरे, मुकेश मेटे, रमेश गोजमगुंडे, व्यंकट पिनाटे, शिवाना नरहरे, विश्वनाथ येणगे यांच्यासह शेकडो शेतकरी उपोषणाला बसले आहेत.



# बुद्ध हे त्यागाचे एकमेवाद्वितीय प्रतीक होय ! ज्येष्ठ पत्रकार गुणाजी काजिर्डेकर यांचेप्रतिपादन

मुंबई / प्रतिनिधी –बुद्धांनी आम्हाला काय शिकवले?, बुद्धांनी आम्हाला काय दिले व बुद्धांकडून आपण काय घेतले? या तीन प्रश्नांवर लक्ष केंद्रीत केले तरी धम्मविचाराच्या जवळपास सहज पोहचता येईल, बुद्धांनी प्रज्ञा, शील,करुणा दिली. याचे कारण बुद्ध हे त्यागाचे दुसरे प्रतीक होय!असे उत्कट प्रतिपादन आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ पत्रकार गुणाजी काजिर्डेकर यांनी केले.

मुंबईतील नागेवाडी, पी.एल.लोखंडे मार्ग, चेंबूर येथील ज्ञानयोगी बुद्ध विहारात प्रबुद्ध परिवार या धम्म संघटनेच्या विद्यमाने वर्षावासानिमित्त आयोजित प्रबोधनपर व्याख्यानमालेतील ११ वे विचारपुष्प गुंफताना गुणाजी काजिर्डेकर बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून शिवसेनेच्या (उबाठा) आयु. रचनाताई पाटील उपस्थित होत्या.

धम्मचक्कपवत्तन सुत्त या विषयाची उकल करताना, खरेतर ज्ञानप्राप्तीनंतर पंचवर्गीय भिक्षुंना उपदेश करण्यासाठी वाराणसीच्या दिशेने जात असताना, उपक्रम आजीला या नग्नसाधुंच्या पंथाचे प्रमुख मख्खली गोशाल यांच्याशी संवाद झाला होता. असे सांगून, तथागतांनी आपण अर्हंत झाल्याचे सांगत असताना त्यांच्या विधानाकडे दुर्लक्ष करून, ' माझे हे सर्व साधू जीन आहेत. त्यांचे चित्तमल (आश्रव) केव्हाच परिशुद्ध



झाले आहे असा दावा करत दुसर्याच मार्गाने निघून गेले. माखली गोपाल यांनी तथागतांनी पूर्ण ऐकून घेतले असते तर त्यांचे नक्कीच परिवर्तन झाले असते. परंतु अज्ञानाच्या अंधःकारात ते शेवटपर्यंत चाचपडत राहिले.

धम्मचक्कपवत्तन हे एकदाच होते. वर्तमानात आपण त्याचे अनुकरण करतो इतकेच. म्हणूनच हा महन्मयी दिवस धम्मचक्क अनुवर्तन म्हटला पाहिजे. तथापि रविवार दिनांक १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षांपासूनच्या सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक गुलामगिरीच्या शृंखला तोडताना, लाखो जनांचे न भूतो न भविष्यती असे परिवर्तन केले या अर्थाने त्यांच्या विषयीची कृतज्ञता म्हणून आपण अशोका धम्म विजयादशमी हा दिवस धम्मचक्र प्रवतर्तन दिन साजरा करत असतो.

गृह व राज्यत्यागानंतर सततच्या चिंतनातून झालेल्या बोधातून चार आर्य सत्य, व आर्य अष्टांगिक मार्ग यांबाबत पंचवर्गीय भिक्षुंना केलेला उपदेश होय. तथापि दहा सद्गुण, अर्थात दहा पारमिता याबरोबरच ८ बोध्यांग, ४ स्मृती, ४ स्मृतीप्रस्थान,४ सम्यक प्रधान, ५ इंद्रिये, ५ऋद्धीपाद, ७ बलस्थाने, असा ३७ तत्वांचा बोधीपक्षीय धर्म या भूमिकेशी निगडीत असल्याचे सांगून, धम्मचक्कपवत्तनाचे फलित म्हणजे तथागत उपदेश करत असताना बसल्याबसल्या भत्ते कौण्डिण्य यांचे अंतःचक्षू उघडले व ते अरिहंत झाले. तथागतांच्यानंतर अर्हंतपदी पोहचलेले कौण्डिण्य हे पहिले भत्ते होत असे मत काजिर्डेकर यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी भावना कला मंचच्या सौ.रीना संजय जगताप यांनी अभंग सादर करून कार्यक्रमास प्रारंभ केला. बाळू रणदिवे यांच्या धम्मदानातून पार पडलेल्या या संगीतमय प्रवचनास सुबोध लंगडे, आदेश पगारे, तुषार समुद्रे, राष्ट्रपाल भंडारे, समीर गायकवाड, यश सोनावणे, धनराज शिराळ, प्रज्ञा रणदिवे, प्राची तांबे, देसना सोनवणे, दिक्षा सोनवणे, सीमा रा.कसबे, अश्विनी समुद्रे, संगीता गायकवाड, सुजाता थोरात, सुगंधा भंडारे, वैशाली खैरनार, इंदुमती निरभवणे, वैशाली कासारे, लताराणी कांबळे, प्राची भंडारे, प्रणाली ढोके, ऋत्तिका शिर्के, आदित्य सोनवणे, तेजस रणदिवे संघराज कदम, सृष्टी कसबे,प्रज्योत,दिवाकर कदम दिक्षा दिवाकर कदम व बाळकृष्ण तांबे आदी उपासक–उपसिका उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी बुद्धप्रिया रणदिवे, व आभार प्रदर्शन प्रबुद्ध परिवाराचे प्रमुख वैभव सोनवणे यांनी केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE